विठठ्लवाडी वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०४ /२०२६ दि. ०९ /०५/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, उल्हासनगर शहर, वाहतुक उपविभाग विठ्ठलवाडी वाहतुक उप विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये शिख समुदायाचा भागवत सप्ताह उत्सव दिनांक ०६/०५/२०२६ रोजी ते दिनांक १२/०५/२०२६ रोजी पावेतो साजरा होत असुन भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत आहे. त्यामुळे उल्हासनगर ५ भागात सर्व प्रकारच्या वाहनांना दिनांक ०९/०५/२०२६ रोजी ते दिनांक १२/०५/२०२६ रोजी पावेतो सायं.१६:०० वा. ते २२:०० वा. पावेतो प्रवेश बंद करण्यात येत आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए ११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे वाहतुक नियत्रंण अधिसुचना जारी करीत आहे :–

प्रवेश बंद –	१) चालीया मंदिर कडुन आकाश कॉलनी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **चालीया मंदिर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने चालीया मंदिर येथुन डाव्या बाजुने वळण घेवुन मठ मंदिर, दुध नाका मार्गे इच्छित स्थळी जातील
प्रवेश बंद –	२) आकाश कॉलनी रोड बॅक ऑफ इंडीया कडुन चालीया मंदिर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बॅक ऑफ इंडीया** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने बॅक ऑफ इंडीया जवळुन डावीकडे वळन घेवुन लालचक्की मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	३) आकाश कॉलनी चौक रिक्षा स्टॅण्ड कडुन चालीया मंदिर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आकाश कॉलनी चौक रिक्षा स्टॅण्ड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने आकाश कॉलनी चौक रिक्षा स्टॅण्ड येथुन उजवीकडे वळण घेवुन मठमंदिर दुधनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना ही **दिनांक ०९/०५/२०२६ रोजी ते दिनांक १२/०५/२०२६ रोजी पावेतो सायंकाळी १६:०० वा. ते रात्री २२:०० वा.** पावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर बिग्रेड, रूग्णवाहिका इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक, विभाग कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, महानगरपालिका, उल्हासनगर

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४, उल्हासनगर/विशेष शाखा

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग कल्याण

प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर

प्रत :– मा.पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरिकाच्या माहितीसाठी ठाणे पोलीस वेबसाईडवर प्रसिद्ध करण्यास विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए.एस.कक्ष ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सहा. पोलीस आयुक्त, उल्हासनगर वाहतूक विभाग, ठाणे शहर.

पोलीस निरीक्षक, उल्हासनगर/विठ्ठलवाडी, वाहतूक विभाग, ठाणे शहर.